# बी.एड.पदवीसाठी सादर केलेल्या कृतीसंशोधनाचे मूल्यमापन करताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

**प्रा. डॉ. टी.ए.चंदनशिवे**
सहा. प्राध्यापक
माऊली शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
वडाळा.

**प्रस्तावनाः-**

बी.एड.चे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी उद्याचे भावी शिक्षक असतात. या भावी शिक्षकांना अध्यापन करताना येणाऱ्या समस्यांची जाणीव होणे गरजेचे आहे. यासाठी त्यांनी निवडलेल्या किंवा येणाऱ्या समस्यंचा अभ्यास करणेसाठी कृती संशोधनासारखी संकल्पना अभ्यासक्रमात आणली आहे. त्या कृतीसंशोधनाचे योग्य मूल्यमापन होणे गरजेचे आहे. कारण हे भावी शिक्षक दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी कृती संशोधनाचा वापर करतील.

**संशोधनाची गरजः-**

बी.एड.चे विद्यार्थी हे उद्याचे भावी शिक्षक असतात अशा भावी शिक्षकांनी येणाऱ्या समस्यांचा केलेला अभ्यास पाहण्यासाठी येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणेसाठी सदर संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाचे महत्त्वः-**

1) बी.एड.च्या प्राध्यापकांना कृतीसंशोधनाचे मूल्यमापन करताना येणाऱ्या अडचणी समजावून घेणेसाठीः
2) बी.एड. अभ्यासक्रम बनवताना कृतीसंशोधन मूल्यमापन पद्धती निश्चीत करणेसाठी.
3) विद्यापीठांना मूल्यमापन निकष ठरवणेसाठी.

**संशोधनाची व्याप्तीः-**

1) सदर संशोधन हे वडाळा गावापुरते आहे.
2) सदर संशोधन हे द्वितीय वर्षापुरते आहे.
3) सदर संशोधन हे कृतीसंशोधन विषयापुरतेच आहे.
4) सदर संशोधन हे 2019-2020 पुरतेच आहे.

**संशोधनाच्या मर्यादाः-**

1) सदर संशोधन हे बी.एड. महाविद्यालयापुरतेच मर्यादीत आहे.
2) सदर संशोधन हे फक्त कृतीसंशोधनापुरतेच मर्यादीत आहे.

3) सदर संशोधन हे कृतीसंशोधन मूल्यमापनातील समस्यांपुरतेच मर्यादीत आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्येः-**

1) बी.एड. विद्यार्थ्यांच्या कृतीसंशोधनाची सद्यःस्थिती अभ्यासणे.
2) कृतीसंशोधनाचे मूल्यमापन करताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
3) कृतीसंशोधनाचे अचूक मूल्यमापन करण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धतीः-**

प्रस्तूत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**नमूना निवडः-**

प्रस्तूत संशोधनासाठी असंभाव्यतेवर आधारीत नमूना निवड प्रकारातील सप्रयोजन पद्धतीचा अवलंब केला.

**संशोधन कार्यपद्धतीः-**

सदर संशोधनासाठी कृतीसंशोधन मूल्यमापन प्रश्नावली शिक्षकांकडून भरून घेतली.

**निष्कर्षः-**

1) सर्वच शिक्षक विद्यापीठ नियमानुसार मूल्यमापन करतात.
2) 50% शिक्षकांच्या मते मूल्यमापनाचे स्पष्ट निकष द्यावेत.
3) 70% शिक्षकांच्या मते कृतीसंशोधन विषयांच्या समस्या त्याच त्याच येतात.
4) जास्तीत जास्त शिक्षकांच्या मते मूल्यमापनासाठी बदलत्या काळानुसार प्रशिक्षण मिळावे.

**शिफारशीः-**

1) विद्यापीठांनी अभ्यासक्रमांत मूल्यमापनाचे स्पष्ट निकष द्यावेत.
2) कृतीसंशोधनासाठी वेळोवेळी कार्यशाळा आयोजित कराव्यात.

**संदर्भः-**

1) मुळे उमाठे, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, विद्या बुक्स, औरंगाबाद.